# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०७/२०२४ (मंगळवार)**

---

## अवैधरीत्या विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०१/०७/२०२४ चे १९/१५ वा. ते १९/४५ वा. दरम्यान पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेड कामी पेट्रोलींग करीत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम मोटरसायकलवर अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफने श्री ड्रेसेस दुकाना जवळ सावनेर येथे नाकाबंदी केली असता मोपेड हिरो प्लेझर क्र. एम एच–४०/बी.यु–१३०२ चा चालक **आरोपी नामे– बबन सुखदेव भोंगा वय ४९ वर्ष रा वार्ड न. १७ पहीलेपार सावनेर त. सावनेर जि. नागपुर** याच्या ताब्यात असलेली मोपेड हिरो प्लेझर क्र. एम एच–४०/बी.यु–१३०२ किंमती २५०००/– रू. मध्ये रॉयल स्टेजच्या १२ निपा किंमती २१६०/– रु चा मुद्देमाल असा एकूण २७,१६० रू. चा मुद्देमाल घेऊन जाताना मिळून आल्याने आरोपीकडुन असा एकुण वाहनासह २७,१६०/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ) म.दा.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि रविंद्र मानकर, पोउपनि स्वप्नील गेडाम, सफौ सुभाष राठोड, पोहवा संतोष बैरागी, पोशि नितेश परखड पोस्टे सावनेर यांनी पार पाडली.

# अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

## पोलीस स्टेशन रामटेक ची कार्यवाही

दिनांक ०२/०७/२०२४ चे ०३.०० वा. ते ०४.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे रामटेक हद्दीतील घोटीटोक चौक रामटेक येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रक द्वारे तुमसर ते रामटेक रोडने चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून घोटीटोक चौक रामटेक येथे रामटेक पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून १६ चक्का ट्रक क्र. एम एच– २७/बी एक्स –७९८६ चा चालक **आरोपी नामे – गजानन राजू धुरवे, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ ग्राम खोमाइ त. भैसदही जि.बैतूल (म.प्र)** याने वाळुची चोरीने उपसा करून चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून १६ चक्का ट्रक क्र. एम एच– २७/बी एक्स– ७९८६ त्यामध्ये बिनापरवाना ८ ब्रास रेती अंदाजे कि. २४,००० रू ट्रक कि. अंदाजे २५,००,०००/– रू असा एकूण २५,२४,००० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरूद्ध भा. न्याय संहीता कलम ३०३(२) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता कलम ४८(७) (८) सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, पोना मंगेश सोनटक्के, प्रफुल रंधई, पोशि शरद गिते, धिरज खंते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर